स.के.नं.५८२/२०२४
नि. क्र. १० लगत

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची जबानी**
**माझे नाव** – मानसी मदन शेटे
**वय वर्षे** –५७, **व्यवसाय** – लेबर कॉन्ट्रॅक्टर
**राहणार** – खेर्डी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी.
**मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करते की,**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एस.आर.वनकर यांचेमार्फत सुरु.**

माझी कृष्णा ॲन्टीऑक्सीडंन्ट युनिट क्र.३ गाने खडपोली, एमआयडीसीमध्ये कामगार पुरवण्याची नियुक्ती होती. मी आरोपींना ओळखते. ते आज रोजी हजर आहेत. दि.१३.०५.२०२४ रोजी मी घरी होते. माझ्या अनुउपस्थित माझे पती सदरचे काम पाहतात. मला अपरांत हॉस्पीटय येथून एच आर शिंदे यांचा फोन आला. त्यांनी मला माहीती दिली की, सदर युनिट मधील कर्मचारी संजय सुर्वे व इतर कामगारांवर कंपनीतील केमिकल पडून ते भाजले असल्यामुळे उपचारासाठी आणले आहे. त्यांना पुढील उपचाराकरीता नॅशनल बर्न हॉस्पीटल, येरोली, मुंबई येथे हलवले आहे. त्यांना मी पाहण्यासाठी हॉस्पीटलला गेले. नंतर काही दिवसांनी उपचार चालू असताना जखमी संजय यशवंत सुर्वे मयत झाले.

**साक्षीदार अभियोग पक्षाला सहाय्य करत नसलेने सरकारी वकील यांचे तोंडी विनंतीवरुन त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १४५ व १५४ अन्वये उलट तपासादरम्यान विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली व ती दिली.**

हे म्हणणे खरे नाही की, सदर दुर्घटननेची मी माहीती घेतली. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३.०५.२०२४ रोजी आरोपी क्र.१ प्रोडक्शन सुपरवायझर कामगार व चालक यांच्याकडून हाय बॉयलर फिनॉल प्लस झायलीन बॅरेल ट्रक मध्ये लोड करत असताना एक बॅरल फूगलेला होता व चालक आणि कामगारांनी ते आरोपी क्र.१ च्या निदर्शनास आणून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०६.२०२४ रोजी

पोलीसांनी माझे तपास टिपण नोंदवले. आता मला तपास टिपणातील अधोरेखांकीत भाग वाचून दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर मी पोलीसांना सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना त्यांच्या निष्काळजीपणाची शिक्षा होवून नये म्हणून आरोपी वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**.
**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांनी नाकारला.</u>**
**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/-
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१,चिपळूण.

दिनांक - २७/०३/२०२६
चिपळूण.

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | २७.०३.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २७.०३.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | ३०.०३.२०२६ |